World Wide Journal of Multidisciplinary Research and Development

WWJMRD 2017; 3(7): 210-211
www.wwjmrd.com
*International Journal*
*Peer Reviewed Journal*
*Refereed Journal*
*Indexed Journal*
*Impact Factor MJIF: 4.25*
E-ISSN: 2454-6615

**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

**Correspondence:**
**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

# ''फादर जोसेफ डेमियन:- महारोग्यात ज्याने ख्रिस्त गाजविला''

## विश्वास गोरखनाथ वळवी

**Abstract**
"There is no exile in the kingdom of God. The soul never gets sick":- Joseph Damien
Father Joseph Damien was born on January 3, 1840 in the small village of Tremelau in Belgium. From an early age, he was involved with the church and Ecclesiastes, and as a child Joseph became interested in serving as an evangelist. Dedicated to: A place where death will embrace you only when you are gone, he accepted death in service. In the United States of America there is a beautiful island called Molokai on the western Pacific Ocean lake. But people are cruel and barbaric in nature. Damian overcame all the challenges that lie ahead by choosing the field of service he served, and the missionary movement with his physical death to win souls for Christ.
Joseph Damien himself was groping for leprosy and carried wood on his shoulders. They collected mulch from trees and built many huts with hard work. Life expectancy increased. Tell me what a miracle this is. God gave Joseph Damien power, and with that power he laid the foundation for a new missionary movement in Europe in the eighteenth century.

**Keywords:** God, Christ, Joseph, Sin, Damian, Damien, Sins, Tears, Scripture, Sinners

**प्रस्तावना:**
''देवाच्या राज्यात हद्दपारी नाही.आत्म्याला कधीच कोणता रोग होत नाही'':-जोसेफ डेमियन
फादर जोसेफ डेमियन यांच्या जन्म 3 जानेवारी १८४० साली बेल्जियम या देशात ट्रेमेलू या छोट्याश्या खेड्यात झाला.लहानपणा पासून चर्च आणि उपदेशक यांच्या सहवासात राहिल्यामुळे आपणही उपदेशक होऊन लोकांची सेवा करावी असा ध्यास लहानपणीच जोसेफचा मनात निर्माण झाला.सज्ञान वय झाल्यावर पवित्रशास्त्राचे शिक्षण पूर्ण केले आणि सेवासाठी स्वत:ला पूर्ण समर्पित करून,अशा ठिकाणी जेथे गेल्यावर फक्त मृत्यू आपल्यांना कवटाळेल तरी देखील त्यांनी सेवेत मृत्युच्या स्वीकार केला.अमेरिकेच्या पश्चिम पैसिफिक महासागराच्या तळ्याला मोलोकाई नावाचे सुंदर बेट आहे.पण लोक मात्र क्रूर आणि रानटी स्वभावाचे.तेथे रक्तपिती आणि महारोग पसरला होता.अशा ठिकाणी डेमियन यांनी सेवेचे क्षेत्र निवडून त्या लोकांची सेवा केली आणि मिशनरी चळवळी पुढील सर्व आव्हाने आपल्या शारीरिक मृत्यूने पेलवून ख्रीस्तासाठी आत्मे जिंकलीत.
मोलोकाई बेटावर जाणाऱ्या डेमियांसाठी पाठविणाऱ्या बिशपने लोकांना म्हटले ''डेमियन हा तुमचा सेवक आहे.तो पित्याप्रमाणे तुमची काळजी घेईल.त्याचा देवावरील प्रचंड विश्वास आणि मानवतेची थोर भक्ती जाज्वल्य आहे.त्याच्या मार्ग मार्ग सत्य व सेवा हाच आहे.त्याच्या प्रेमळ सहवासात स्वर्ग आहे.त्याच्याबरोबर देवच तुमच्यात वस्ती करील.तुमचे अश्रू तो पुसून टाकेल.'' श.रा.देवळे.म्हणतात ''१८८९ साली फादर डेमीयांची शवपेटि तेथील महारोग्यांनी उचलली तेव्हा सर्वांच्या डोळ्यातून अश्रुंचे पूर वाहत होते.त्या महारोग्यांचा महाप्रभू त्यांना सोडून गेला होता.तो देवाजवळ त्यांच्या सुखासाठी रदबदली करण्यासाठी गेला होता.पहिल्या दिवशी त्या झालाखाली तो विसावला होता,त्याच जागी शेवटच्या दिवशी त्याचे दफन करण्यात आले.तेथे एक साधे पवित्र स्मारक उभारण्यात आले.''
दलित पीडित आणि रोगी मनुष्य आपले जीवन पुरते समजून जीवनकर्त्याला दोष द्यायला लागतो.स्वतःचा जन्माला कोशायला लागतो.मिने का जन्म घेतला आणि हे कोणत्या पापाचे प्रतिफळ मला मिळत आहे.अशा प्रकारचा वैचारिक द्वंद्वातून जाणाऱ्या मोलोकाई बेटातील लोकांसाठी जोसेफ डेमियन हा देवाच्या दूतापेक्षा कमी नव्हता. जोसेफ डेमियन यांनी सर्वप्रथम पवित्रशास्त्र आणि त्यातल्या पापाचा भयंकर मृत्यूच्या संदेश यावर भाष्य केले.लोकांना समजून संगीतले आपण कसे जन्मतःच पापी

आहोत आणि पापाचा मोबदला अनंत मृत्यू आहे.ख्रिस्त कशाप्रकारे आपल्यांना शारीरिक आणि आध्यात्मिक आरोग्य देतो.देवाची कृपा ही ना थांबणारी आही.देवाची दया आज मोलोकाई लोकांसाठी उदय झालेली आहे.ख्रिस्त आज तुमच्या हृदयापाशी उभा.देवाचा संदेश देत जोसेफ डेमियन याने पन्नास वर्षे मोलोकाई लोकांची शारीरिक सेवा देखील केली. लोकांना रोगराईच्या परिस्थितीत देखील शांती लाभली कारण जोसेफ डेमियनने यांनी कधीही पवित्र वचन आणि प्रार्थना त्यांच्यापासून दूर केली नाही.जोसेफ डेमियन यांचे जीवन आपल्यांना शिकविते देव त्याच्या सेवेसाठी आपले पाचारण करतो पण त्याला आपण प्रतिसाद दिला पाहिजे ज्या ठिकाणी देवाने आपल्याला पाचारण केलेले त्याच ठिकाणी आपण ख्रिस्त घेऊन गेला पाहिजे.ख्रिस्ताचे कार्य वाढावे त्यासाठी निर्जन स्थळ असो की जंगल या देवाने संगीतलेव्या पचारणाला स्वतःचे जीवन चिटकवून चालणाराचं खरा ख्रिस्ती मिशनरी असतो.

जोसेफ डेमियन यांनी स्वतः महारोग्यासाठी कमर कसली आणि स्वतःच्या खांद्यावर लाकडे वाहून।झाडाचा पालापाचोळा गोळा केला आणि कष्टमय खडतर परिश्रम करून अनेक झोपड्या बांधल्या.पुढे शहरीकरण घडवून आणले.अनेक झरे आणि तलाव खोदून स्वच्छ पाण्याची सुविधा करून दिली.स्वछतेमुळे मोलोकाई बेटावर रोगराई कमी झाली.लोकांचे आयुमान वाढले.सांगा मला हा कोणता चमत्कार आहे. देवाने जोसेफ डेमियन यांना सामर्थ्य दिले आणि त्या सामर्थ्याच्या परिश्रमाने खऱ्या अर्थाने त्यांनी मिशनरी चळवळीचा नवीन पायंडा युरोपात अठराव्या शतकात घालून दिला.

**संदर्भसुची:-**


१) ख्रिस्ती मिशनरींचे योगदान,पारखे कामिल,सुगावा प्रकाशन,२००३,पुणे.
२) जगातील महान व्यक्ती,श.रा.देवळे,साकेत प्रकाशन,पुणे.
३) महाराष्ट्रातील ख्रिस्ती मिशन्सचा इतिहास,रेव्ह.बी.सी.भोसले.इम्मनुएल प्रकाशन,पुणे